आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -रात्री ८.०५ वाजता

१६ नोव्हेंबर २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आजपासून नायजेरिया, ब्राझील आणि गयाना या तीन देशांच्या दौऱ्यावर रवाना

- देशात सकारात्मक सामाजिक परिवर्तन घडवण्यात लेखा परीक्षणाची भूमिका महत्वपूर्ण असल्याचं लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांचं प्रतिपादन

- महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान आदर्श आचारसंहिता उल्लंघन प्रकरणी भाजपा आणि काँग्रेसच्या अध्यक्षांवर केंद्रीय निवडणूक आयोगाच्या नोटिसा

- महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीसाठी झंझावाती प्रचार/नमो ॲपच्या माध्यमातून प्रधानमंत्र्यांचा भाजपाच्या बूथ कार्यकर्त्यांशी संवाद, इतर पक्षांच्या नेत्यांच्या ठिकठिकाणी सभा

**आणि**

- छत्तीसगढमधे नारायणपूर जिल्ह्यातल्या अबुझमाड इथे सुरक्षा दलांबरोबरच्या झालेल्या चकमकीत पाच माओवादी ठार

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आजपासून नायजेरिया, ब्राझील आणि गयाना या तीन देशांच्या दौऱ्यावर रवाना झाले. सहा दिवसांच्या या दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात प्रधानमंत्री नायजेरियाचे राष्ट्राध्यक्ष बोला अहमद टिनुबू यांच्या निमंत्रणावरून नायजेरियाला जाणार आहेत. गेल्या १७ वर्षांत भारताच्या प्रधानमंत्र्यांची ही

पहिलीच नायजेरिया भेट असेल. त्यानंतर G-20 शिखर परिषदेला उपस्थित राहण्यासाठी मोदी १८ तारखेला ब्राझीलच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. जी 20 शिखर परिषदेच्या निमित्ताने मोदी अनेक जागतिक नेत्यांना भेटतील.

तिसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यात मोदी १९ ते २१ नोव्हेंबर या कालावधीत गयानाचा दौरा करणार आहेत. १९६८ नंतर एखाद्या भारतीय प्रधानमंत्र्यांची ही गयानाची पहिली भेट असेल. मोदी गयानाचे अध्यक्ष अली यांच्याशी चर्चा करतील. गयानात जॉर्जटाउनमध्ये मोदी दुसऱ्या कॅरिकॉम -इंडिया शिखरपरिषदेत सहभागी होतील.

**<><><><><>**

चुकीची माहिती देऊन ती पसरवणाऱ्या समाज माध्यमांच्या आजच्या युगात सरकार खंबीर आणि दृढनिश्चयी आहे, असं मत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी खाजगी माध्यम संस्थेनं आयोजित केलेल्या लीडरशिप समिटमधे व्यक्त केलं. सरकार मतपेढीच्या राजकारणापासून दूर असून लोकांच्या प्रगतीचा मंत्र घेऊन काम करत आहे, देशाला विकसित राष्ट्र बनवण्याचं सरकारचं उद्दिष्ट आहे असं ते म्हणाले. भारत लवकरच जगातली तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनेल, असा विश्वास मोदी यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

देशात सकारात्मक सामाजिक परिवर्तन घडवण्यात लेखा परीक्षणाची भूमिका महत्वपूर्ण असल्याचं लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत चौथ्या लेखा परीक्षण दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. सार्वजनिक संपत्तीचा उपयोग नागरिकांच्या कल्याणासाठी आणि राष्ट्राच्या

विकासासाठीच केला जाईल याची हमी कॅगमुळे मिळते, असंही ते म्हणाले. देशातलं सुशासन आणि पारदर्शकता यात कॅग नं दिलेल्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी लेखा परिक्षण दिन साजरा केला जातो.

<><><><><>

महाराष्ट्रात रेल्वे विकासाकरता १ लाख ६४ हजार ६०५ कोटी रुपयांची आणि मेट्रो मध्ये १ लाख १० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होत असल्याचं रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत सांगितलं. राज्यातल्या १३२ स्टेशनचा अमृत भारत अंतर्गत विकास सुरू आहे. मुंबईत ३२० किलोमीटरचे नवे रेल्वे मार्ग टाकले जात आहेत. त्यासाठी १६ हजार कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक होत आहे. याशिवाय मनोरंजन क्षेत्रात नवीन तंत्रज्ञान आणि कुशल मनुष्यबळ यावं यासाठी Indian Institute of Creative Technology ची स्थापना करायला केंद्र सरकारनं मंजुरी दिली आहे. यातली पाहिली संस्था मुंबईत सुरू होणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

<><><><><>

विधानसभा निवडणुकांच्या प्रचारात आदर्श आचारसंहितेचं पालन होत नसल्याच्या तक्रारी भाजपा आणि काँग्रेसनं एकमेकांविरोधात दाखल केल्यानंतर आज निवडणूक आयोगानं भाजपाचे अध्यक्ष जे पी नड्डा आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्यावर वेगवेगळ्या नोटिसा बजावल्या. सोमवारी दुपारी एक वाजेपर्यंत दोन्ही पक्षाध्यक्षांनी याबद्दल उत्तर द्यावं, असं आयोगानं नोटिशीत म्हटलं आहे. लोकसभा निवडणुकांसाठी २२ मे रोजी जारी केलेल्या सूचनांचं पालन करून

दोन्ही पक्षांच्या स्टार प्रचारक आणि नेत्यांनी प्रचारादरम्यान सभ्यतेचं पालन करावं, असंही या नोटिशीत म्हटलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीसाठी झंझावाती प्रचार सुरु आहे. सर्व पक्षांच्या बड्या नेत्यांच्या ठिकठिकाणी प्रचारसभा, रोड शो, मुलाखती, असे कार्यक्रम होत आहेत. पत्रकार परिषदा, समाजमाध्यमं, प्रसारमाध्यमं, जाहिराती अशा विविध मार्गांनी हे नेते मतदारांना आवाहन करत आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नमो ॲपच्या माध्यमातून राज्यातल्या भाजपाच्या बूथ कार्यकर्त्यांशी संवाद साधला. ‘मेरा बूथ सबसे मजबूत’ ही या संवादामागची संकल्पना होती. मतदारांना भाजपाच्या संकल्पाची माहिती समजावून सांगून भाजपाला मतदान करण्याचं आवाहन प्रेमानं करावं, असं मोदी यांनी मार्गदर्शन करताना सांगितलं.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांची आज वसईत सभा झाली, त्यानंतर ते पुण्यात शिवाजीनगर आणि कॅम्पात सभा घेत आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आज कोकणात तीन सभा झाल्या. कोकणच्या विकासाकरता पैसा कमी पडू दिला जाणार नाही, असं आश्वासन त्यांनी दिलं.

मुंबईतली धारावी झोपडपट्टी अदानी उद्योगसमूहाला दिलेली नसून धारावी पुनर्विकास प्रकल्प सरकारी भागीदारीतून उभा राहत असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज गडचिरोलीत प्रसारमाध्यमांना सांगितलं. पोलिसांनी अत्यंत परिश्रमाने गडचिरोली जिल्ह्यातला नक्षलवाद संपवला असून बेरोजगारांच्या हाताला काम देण्याचा संकल्प सरकारनं केल्याचंही फडणवीस म्हणाले.

**<><><><><>**

सत्तेत आल्यावर शेतकऱ्यांचं ३ लाख रुपयांपर्यंत कर्ज माफ करण्याचं आश्वासन काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज चंद्रपूर जिल्ह्यात चिमूर इथं प्रचारसभेत दिलं. मोदी सरकारनं देशातल्या मूठभर उद्योगपतींची अब्जावधी रुपयांची कर्ज माफ केली, असं ते म्हणाले.

जीएसटीच्या माध्यमातून सरकार जनतेची लूट करत असून बड्या भांडवलदारांना कोट्यवधी रुपयांची सूट दिली जात आहे, अशी टीका गांधी यांनी केली.

**होल्ड-बाईट-गांधी (२० सेकंद)**

कापूस आणि सोयाबीन पिकांना हमीभाव, सर्वांना २५ लाख रुपयांपर्यंतचा वैद्यकीय विमा, महिलांसाठी राज्यात सर्वत्र मोफत एस टी प्रवास विशेष समिती नेमून कांद्याला योग्य भाव देण्याचं आश्वासन राहुल गांधी यांनी आज अमरावती जिल्ह्यात धामणगाव रेल्वे इथल्या प्रचारसभेत दिलं. केंद्र सरकारनं जातीवर आधारित जनगणना करून आरक्षणावरची ५० टक्के मर्यादा हटवावी, असं काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनी आज शिर्डीत साकोरी इथं प्रचारसभेत सांगितलं. कोल्हापूर इथंही प्रियंका गांधी यांची सभा झाली.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या

कार्यक्रमात उद्या सांगली जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

<><><><>

झारखंड विधानसभेच्या दुसऱ्या टप्प्यातल्या मतदानासाठीच्या प्रचाराला आता वेग आला आहे. रालोआ अर्थात राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि इंडिया अर्थात भारतीय राष्ट्रीय विकासात्मक समावेशक आघाडीच्या दिग्गज नेत्यांच्या आज झारखंडमधे प्रचारसभा झाल्या. झारखंडमधलं हेमंत सोरेन सरकार आदिवासींना व्होटबँक समजून वागवत आहे, असा आरोप भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी प्रचारसभेत केला. हिमंता बिसवा सरमा, मिथुन चक्रवर्ती यांनीही रालोआच्या प्रचारसभेला संबोधित केलं. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे तसंच झारखंड मुक्ती मोर्चाचे नेते आणि मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्याही सभा झाल्या.

<><><><>

छत्तीसगढमधे नारायणपूर जिल्ह्यातल्या अबुझमाड इथे आज सकाळी सुरक्षा दलाच्या जवानांशी झालेल्या चकमकीत पाच माओवादी ठार झाले. यात २ महिलांचा समावेश आहे. त्यांचे मृतदेह सुरक्षा दलांनी ताब्यात घेतले आहेत. याशिवाय चकमकीच्या ठिकाणावर मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा जप्त करण्यात आला. या चकमकीत २ सुरक्षा जवानही जखमी झाले. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून  आता त्यांची प्रकृती स्थिर आहे.

<><><><>

बिहारच्या राजगीर स्टेडियमवर सुरू असलेल्या महिला हॉकी आशिया करंडक स्पर्धेत भारतानं आपल्या वैयक्तिक चौथ्या सामन्यात आज चीनला ३-० अशा गोल फरकानं हरवत या स्पर्धेत अपराजित राहण्याचा आपला विक्रम कायम ठेवला आहे. प्रतिस्पर्धी चीनच्या संघानंही या स्पर्धेत आतापर्यंत एकही हार पत्करली नव्हती. मात्र, आजच्या सामन्यात चीनच्या चांगल्या सुरुवातीनंतरही भारतीय खेळाडू संगीता, सलीमा आणि दिपीका यांनी आक्रमक खेळ करून प्रत्येकी एक गोल झळकावत भारताला विजय मिळवून दिला.

आज झालेल्या अन्य सामन्यात जपाननं मलेशियाला २-१ नं तर दक्षिण कोरियाने थायलंडला ४-० अशा गोलफरकानं पराभूत केलं. उद्या भारताचा सामना जपानबरोबर होणार आहे.

//<><><><><>//